सन २०१८-१९ करिता राज्यस्तरीय विशेष घटक योजनेअंतर्गत संरक्षित वनाचे क्षेत्रालगत गावातील अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना कुकींग गॅस, बायो गॅस, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीचे संरक्षण करणेबाबत नविन बाब प्रस्ताव. (२४०६ ८१९५)

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०१८/प्र.क्र.७५/फ-२

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- २७ मार्च, २०१९

<u>संदर्भ</u>: १) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एफडीएम-२०१२/प्र.क्र.४/फ-२, दि.१०.०७.२०१२

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/ पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.२२/१८-१९/७८५ दि.०१.०८.२०१८.

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/ पी/यो/नबाप्र/प्र.क्र.४४/७९१/१८-१९, दि.०२.०८.२०१८.

४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/ पी/यो/नबाप्र/प्र.क्र.४४/२४१०/१८-१९, दि.२०.३.२०१९.

५) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९

६) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि.८.०३.२०१९

<u>प्रस्तावना</u> :-

संरक्षित वनालगतच्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना/ ग्रामस्थांना सवलतीच्या दराने बायोगॅस/ स्वयंपाक गॅस पुरवठा, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीच्या संरक्षणासाठी प्रोत्साहन देण्याबाबतची योजना संदर्भ क्र. १ वरील दि.१०.०७.२०१२ च्या शासन निर्णयान्वये राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

२. शासन परिपत्रक वित्त विभाग दि. २५.१.२०१९ अन्वये संबंधित प्रशासकीय विभागास महसुली लेख्यातील कार्यक्रम खर्चाच्या बाबीवर एकूण वार्षिक तरतुदीच्या ८० % निधी वितरीत करण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच वित्त विभागाच्या दि.०८.०३.२०१९ रोजीच्या परिपत्रकास

अनुसरुन महसूल व वन विभागातील ब-१ कार्यासनाने त्यांच्या दि.११.०३.२०१९ रोजीच्या ज्ञापनान्वये सन २०१८-१९ चे आठमाही सुधारीत अंदाज उपलब्ध करुन दिले असून सदर सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत खर्च करण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे. सन २०१८-१९ च्या सुधारित अंदाजानुसार (२४०६ ८१९५) या लेखाशिर्षाखाली रु.२०००.०० लक्ष निधी वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. आतापर्यंत सदर योजनेंतर्गत रु. १९५२.५५ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून सद्यस्थितीत रु.४७.४५ लक्ष इतका निधी वितरणासाठी उपलब्ध आहे. त्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.४ वरील पत्रान्वये संरक्षित वनाचे लगत क्षेत्रातील अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना कुकींग गॅस पुरवठा करणे, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीच्या संरक्षणासाठी प्रोत्साहन देणे या योजनेसाठी २४०६ ८१९५ या लेखाशीर्षाअंतर्गत सादर केलेला प्रस्ताव सुधारित अंदाजाच्या मर्यादेत असल्याने त्यास निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी सहमती दर्शविली आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.४ वरील पत्रांन्वये शासनास सादर केलेले प्रस्ताव तसेच वित्त विभागाने दि.०२.०४.२०१८, दि.२५.०१.२०१९ व दि. ८.०३.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता, संरक्षित वनाचे लगत क्षेत्रातील अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना एलपीजी कुकींग गॅस, बायो गॅस, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीच्या संरक्षणाकरिता **रु.४७.४५ लक्ष (सत्तेचाळीस लाख पंचेचाळीस हजार)** (५०-इतर खर्च) इतका निधी वितरीत करण्यास व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वरील अनुदान खर्च करतांना खालील अटी व शर्ती यांची पूर्तता होईल याची दक्षता घ्यावी:-

अ) उपरोक्त वितरीत केलेल्या निधीच्या मर्यादेत प्रथम जुन्या लाभार्थ्यांच्या प्रस्तावातील लाभार्थ्यांसाठी अनुदानाचा विनियोग करावा. त्यानंतर, नवीन लाभार्थ्यांच्या

प्रस्तावाप्रमाणे नवीन लाभार्थी निश्चित करुन त्यांचेकरिता अनुदानाचा विनियोग करावा.

ब) सदरहू योजनेतील लाभार्थी या विभागाच्या शासन निर्णय क्रमांक, महसूल व वन विभाग क्र.एफडीएम-२०१२/प्र.क्र.४/फ-२, दि. १०.०७.२०१२, शासन शुध्दीपत्रक क्र. एफडीएम-२०१२/प्र.क्र.४/फ-२, दि.०८.०१.२०१३ व शासन शुध्दीपत्रक क्र.एफडीएम-२०१२/प्र.क्र.२४९/फ-२, दि.०५.०५.२०१४ मधील अटी व शर्तीनुसार असतील याची खात्री करावी.

क) अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची यादी सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील सहायक आयुक्त समाजकल्याण यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावी.

ड) सदरहू योजनेतील लाभार्थ्यांनी दिनांक.१०.०७.२०१२ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार एलपीजी कुकींग गॅस साठी व बायो गॅस साठी लाभार्थ्यांचा २५% हिस्सा दिल्याची खात्री करावी.

इ) सदर योजनेअंतर्गत वन विभागाकडून कोणतीही खरेदी करण्यात येणार नाही. ज्या लाभार्थ्यांनी एलपीजी गॅस साठी (२५%) व बायोगॅस साठी (२५%) त्यांचा हिस्सा दिल्यानंतर संबंधित वन विभागाचे उप वनसंरक्षक हे संबंधित योजनेबाबतचे अनुदान संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यामध्ये टप्प्या टप्प्याने जमा करतील व संयुक्त वन व्यवस्थापन समिती लाभार्थीनिहाय सदरहू रक्कम संबंधित गॅस एजन्सीला देईल.

फ) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना वितरीत करण्यात येणा-या निधीचा विनियोग त्याच आर्थिक वर्षात होईल व सदर निधी अनुसूचित जाती व नव-बौध्द घटकातील लाभार्थ्यांवरच होईल याची दक्षता घ्यावी.

ग) सदर योजनेअंतर्गत मागील वर्षी वितरित केलेल्या निधीच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्रत शासनास सादर करावे.

५. उपरोक्त खर्च मागणी क्र.सी-७, प्रधानशीर्ष - २४०६, वनीकरण व वन्यजीवन, १०१ वनसंरक्षण, विकास व पुनर्निर्मिती, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, अनुसूचित जाती उपयोजना,

(१४) संरक्षित वनाच्या लगतच्या गावातील अनुसूचित जातीच्या कुटूंबांना कुकींग गॅस व सोलर कुकरचा पुरवठा करणे, (१४) (०१) संरक्षित वनाच्या लगतच्या गावातील अनुसूचित जातीच्या कुटूंबांना कुकींग गॅस व सोलर कुकरचा पुरवठा करणे, ५०-इतर खर्च (२४०६ ८१९५) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भ क्र.५ व ६ वरील दि.२५.१.२०१९व दि. ८.३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१८/विघयो, दि.२४.०१.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२७१२४९४०९२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d36623 3b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad 33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.03.27 12:52:21 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रत :-

१) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय मुंबई
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) / (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा.नागपूर.
५) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
६) मुख्य वनसंक्षक (प्रादेशिक), सर्व
७) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

९) जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
१०) वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन मंत्रालय, मुंबई.
११) नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई.
१२) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
१३) मा.मंत्री (सामाजिक न्याय) /मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव.
१४) सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग,विघयो, मंत्रालय, मुंबई
१५) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.